**L. A. BILL No. XXIV OF 2026.**

A BILL

FURTHER TO AMEND THE WILD LIFE (PROTECTION) ACT, 1972, IN ITS APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA.

**सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक २४.**

**वन्य जीव (संरक्षण) अधिनियम, १९७२, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**(विधानसभेने दिनांक १८ मार्च, २०२६ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**(विधानपरिषदेने दिनांक २३ मार्च, २०२६ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

१९७२ चा ५३.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, वन्य जीव (संरक्षण) अधिनियम, १९७२, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सत्त्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, वन्य जीव (संरक्षण) (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, २०२६, असे म्हणावे.



(शा.म.मु.) एचबी ३५१२-१ (२५०-३-२०२६)

(२) तो, राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील, अशा दिनांकास अंमलात येईल.

सन १९७२ चा अधिनियम क्रमांक ५३ याच्या कलम १२ ची सुधारणा.

**२.** वन्य जीव (संरक्षण) अधिनियम,१९७२, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्याच्या कलम १२ च्या परंतुकामध्ये,- १९७२ चा ५३.

(एक) खंड (क) मधील, “अनुसूची एक मध्ये” या मजकुरानंतर, “अनुसूची एक मधील, भाग कः सस्तन प्राणी यांमधील अनुक्रमांक ४३ येथील नोंदीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या बिबट्या पॅन्थेरा पार्डस वगळता,” हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल;

(दोन) खंड (ख) मधील, “अन्य कोणत्याही वन्य प्राण्याच्या” या मजकुरानंतर, “अनुसूची एक मधील, भाग कः सस्तन प्राणी यांमधील अनुक्रमांक ४३ येथील नोंदीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या बिबट्या पॅन्थेरा पार्डस यासह, ” हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक २४.]**

**[वन्य जीव (संरक्षण) अधिनियम, १९७२, महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

[**श्री. गणेश नाईक**,
वन मंत्री.]

**[विधानसभेने दिनांक १८ मार्च, २०२६ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**[विधानपरिषदेने दिनांक २३ मार्च, २०२६ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**डॉ. विलास आठवले,**
सचिव -३,
महाराष्ट्र विधानपरिषद.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.